मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

**[१२(१)] भूशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र यांच्यामधील कराराचा (MoU) सुधारित मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: मा. संचालक, भूशास्त्र संकुल यांनी दि.०३/१०/२०१६ रोजीच्या पत्रानुसार राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र सोलापूर व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या दोन्ही संस्थेमध्ये संशोधन, शिक्षण इत्यादीची देवाण-घेवाण व आदान-प्रदान करण्याकरिता तयार केलेल्या कराराच्या मसूद्यामध्ये डॉ. एन. व्ही. सिंग, शास्त्रज्ञ व संचालक, राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र यांनी दुरुस्ती सूचविली आहे. त्यानुसार सदर करारामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली असून, त्यास मान्यता मिळावी अशी विनंती केली आहे.

तत्पूर्वी मा. संचालकाच्या दि.२१/०६/२०१६ रोजीच्या पत्रानुसार सदर कराराचा मसूदा दि.२६/०७/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवले असता, व्यवस्थापन परिषदेने खालील ठराव पारित केला आहे.

| |
|---|
| "राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र (NRCP) सोलापूर व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात करावयाच्या कराराच्या मसूद्यास (MoU) सर्वानुमते मान्यता देण्यात आली." |

सबब, मा. संचालक, भूशास्त्र संकुल यांनी दि.०३/१०/२०१६ रोजीच्या पत्रानुसार विनंती केल्याप्रमाणे सोबत जोडलेला सुधारित कराराचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: भूशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र यांच्यामधील कराराच्या (MoU) सुधारित मसूद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**